महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यवतमाळ विभाग

विभागीय कार्यालय, आर्णी रोड, यवतमाळ – ४४५००१

जाक्र.राप/विनिय/आस्था/ई–करा/ 8006

दि. २५/११/२०२४

प्रति,

१)यंत्र अभियंता(चा)/वि.वाह.अधिकारी/वि.लेखाअधि./वि.वाह.अधिक्षक(अप)/काम.अधिकारी/ वि.भांडार अधि/वि. अभियता/वि.सांख्यिकी/विकर्मवर्गअधिकारी/सुरक्षा व दक्षता अधिकारी, राप यवतमाळ

२) आगार प्रमुख,राप यवतमाळ/वणी/पुसद/दारव्हा/उमरखेड/पांढरकवडा/ नेर/दिग्रस/राळेगांव

३)प्राचार्य, चालक प्रशिक्षण विद्यालय राप पांढरकवडा...

विषय :– शिकाउ उमेदवारांची भरती सन २०२४

मध्यवर्ती कार्यालयाचे परीपत्रकान्वये राप महामंडळामध्ये खालील दर्शविलेल्या ट्रेडकरीता शिकाउ उमेदवार पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. सदर उमेदवाराने ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. त्यांचेच कॉन्ट्रॅक्ट रजिस्ट्रेशन होतील.

| अक | ट्रेडचे नांव | जागा | शैक्षणीक अर्हता व इतर अटी |
|---|---|---|---|
| १ | मोटर मेकॅनिक | ७५ | एसएससी पास आयटीआय मोटरमेकॅनिक ट्रेड पास |
| २ | शिटमेटल | ३० | एसएससी पास आयटीआय शिटमेटल ट्रेड पास |
| ३ | डिझेल मेकॅनिक | ३४ | एसएससी पास आयटीआय डिझेल मेकॅनिक ट्रेड पास |
| ४ | मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रीकल ॲण्ड इलेक्ट्रॉनिक | ३० | एसएससी पास आयटीआय मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रीकल ॲण्ड इलेक्ट्रॉनिक ट्रेडपास |
| ५ | सधता (वेल्डर) | २० | एसएससी पास आयटीआय वेल्डर ट्रेड पास |
| ६ | रेफ्रिजरेशन अॅन्ड एअर कंडिशनर | १२ | एसएससी पास आयटीआय रेफ्रिजरेशन अॅन्ड एअर कंडिशनर ट्रेड पास |
| ७ | टर्नर | ०२ | एसएससी पास आयटीआय टर्नर ट्रेड पास |
| ८ | पेंटर जनरल | ०५ | एसएससी पास आयटीआय पेंटर ट्रेड पास |
| | एकुण :– | २०८ | |

आवश्यक असलेल्या अटींची पुर्तता करीत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यात अर्ज दिनांक १३/१२/२०२४ रोजी पर्यंत या कार्यालयास सादर करावे उशीरा आलेल्या अर्जांना विचार केल्या जाणार नाही.

अर्ज सादर करतेवेळी अर्जासोबत राष्ट्रीयकृत बॅंकेचा " MSRTC Fund Account, Yavatmal या नांवे खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये ५९०/– व मागासवर्गीय उमेदवारानी रुपये २९५/–चा डी.डी.जोडणे आवश्यक आहे.

अक. १,२,३,४,५,६,७ व ८ ट्रेडकरीता उमेदवाराचे वय १३/१२/२०२४ रोजी कमीत कमी १८ वर्षे व ३३ वर्षापेक्षा जास्त असु नये. मागासवर्गीय उमेदवारांच्या वयोमर्यादेत ५ (पाच) वर्षे सुट देण्यात येईल. सदर परीपत्रकाची पोच देण्यात यावी व परीपत्रकाची एक प्रत सुचनाफलकावर लावुन जास्तीत जास्त प्रसिध्दी करण्यात यावी. परीपत्रक प्रशासनाच्या नोटीसबोर्डवर लावल्याबाबतची दोन कर्मचा–यांची स्वाक्षरी घेतलेली प्रत या कार्यालयास उलटटपाली पाठविण्यात यावी. कोणत्याही आगारातुन/शाखेतुन प्रत मिळाली नाही अशी तक्रार उद्भवणार नाही, याची काळजी घ्यावी.

तसेच प्रशिक्षण पुर्ण झालेल्या उमेदवारांना राज्य परिवहनमध्ये सामावुन घेण्याबाबत कोणताही विचार केल्या जाणार नाही किंवा राप महामंडळावर कोणतेही बंधन राहणार नाही, या-ची नोंद घ्यावी.

विभाग नियंत्रक,

राज्य परिवहन यवतमाळ